**<u>नियमित दिवाणी दावा क्र.११२/२०२३ मधील नि.क्र.१४ वरील आदेश</u>**

श्री. कृष्णा जनकू गावडे

**वि.**

श्री. जानबा धोंडीबा तेजम, वगैरे.

प्रतिवादी क्र.२, ३, ५ व ७ यांनी नि.क्र.१४ वरील अर्जाद्वारे त्यांच्याविरुध्द आपोआप नियमानुसार पारीत झालेला 'विना बचावपत्र' चा आदेश रद्द करुन त्यांचे अर्जासोबत दाखल केलेले बचावपत्र अभिलेखावर घेण्यासाठी विनंती केली आहे. अर्जात प्रतिवादी कथन करतात की, त्यांना दाव्यातील आदेशिकाची बजावणी झाल्यानंतर ते त्यांचे वकीलामार्फत सदरकामी हजर झाले आहेत. मात्र, दि.२०/१२/२०२३ रोजी अनावधानाने कैफियत व मनाई अर्जास म्हणणे देणेसाठीचा अर्ज देणेचे राहून गेले. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करणेस जाणुनबुजून विलंब केलेला नाही. सदर प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ झाला नाही तर त्यांना त्यांच्या कायदेशीर हक्कापासून वंचित राहावे लागणार असून त्याचे आतोनात असे नुकसान होणार असून त्यास न्यायापासून वंचित राहावे लागणार आहे. म्हणून त्यांनी न्यायाखातीर त्यांचे विरूद्ध नियमानुसार पारीत झालेला विना कैफियतीचा आदेश रद्द करून सदरचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे. अर्जासोबत प्रतिवादी क्र.३ यांनी शपथपत्र सादर केले आहे.

२. याउलट, वादीने अर्जाचे तळाशी त्यांचे म्हणणे दाखल करुन सदर अर्जास तीव्र हरकत घेऊन अर्ज कॉस्टसह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. वादीने सदरचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. नैसर्गिक न्याय तत्वानुसार, बचावाची संधी ही या तत्वाचा मूल आधार आहे. त्यामुळे बचावाची संधी नाकारणे सुध्दा न्यायसंगत होणार नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाचे '***<u>संदिप थापर वि. एस.एम.इ. टेक्नॉलॉजीस, एआयआर २०१४ सर्वोच्च न्यायालय ८९७</u>***' मधील न्यायनिर्णयात उध्दृत केल्यानुसार बचावपत्र दाखल करण्यास केवळ ३० दिवसांचा अवधी कायदयाने मान्य आहे व त्यापुढील ६० दिवसाचा वाढीव अवधी हा केवळ अपवादात्मक परिस्थितीमध्ये मान्य करता येईल. या वाढीव अवधीचा उद्देश हा एखादया पक्षावर होणारा अन्याय होऊ न देणे हाच आहे. तथापि, सहजपणे अशा प्रकारचा अर्ज व अशा प्रकारची विनंती मान्य करता येणार नाही हा सुध्दा प्रस्थापित

विधिसिध्दांत आहे. प्रकरणाचे अभिलेख पाहता, प्रतिवादी यांना या प्रकरणातील दावा आदेशिका दि.२१/०९/२०२३ प्राप्त झाल्यानंतर वस्तुतः, त्यांनी मुदतीत त्यांचे बचावपत्र दाखल करणे आवश्यक होते. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दि.१८/०१/२०२४ रोजी दाखल केला आहे. यावरून प्रतिवादींना बचावपत्र दाखल करण्यास २८ दिवसाचा विलंब झाल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. तथापि, बचावाची संधी ही नैसर्गिक न्यायतत्वाचा महत्वाचा भाग आहे. अर्जदार प्रतिवादी यांनी अर्जात नमुद केलेल्या कारणांचा विचार करून झालेल्या विलंबाबाबत व त्यामुळे झालेल्या प्रतिपक्षाच्या नुकसानीबाबत सुध्दा विचार होणे न्यायाचे संतुलन राखण्यासाठी आवश्यक बनते. या सर्व बाबींचा साकल्ल्याने विचार करुन अर्जदार प्रतिवादी विरुध्द खर्चाच्या रकमेचा आदेश करुन त्यांचे बचावपत्र अभिलेखावर घेण्यासाठी पात्र आहे. सबब, पुढील आदेश.

**आ दे श**

प्रतिवादी क्र.२, ३, ५ व ७ यांचा नि.क्र.१४ वरील अर्ज रक्कम रू.२००/– वादी यांना देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

प्रतिवादी क्र.२, ३, ५ व ७ यांनी नि.क्र.१५ वर दाखल केलेले बचावपत्र अभिलेखावर पुढील शर्ती व अटींना अधीन राहून नोंदविण्यात येत आहे.

प्रतिवादी क्र.२, ३, ५ व ७ यांच्याविरुध्द आपोआप नियमानुसार पारीत झालेला 'विना बचावपत्र' चा आदेश त्यांनी पुर्तता केल्यानंतर रद्द ठरेल.

प्रतिवादी क्र.२, ३, ५ व ७ यांनी खर्चाच्या रकमेची पुर्तता पुढील तारखेपर्यंत न केल्यास सदर आदेशाचा अंमल संपुष्टात येईल याची अर्जदार प्रतिवादी क्र.२, ३, ५ व ७ यांनी व वादीने नोंद घ्यावी.

DISTRICT COURT, MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2024.05.03 16:19:32 +0530

**दि. ०३/०५/२०२४.** **(चारूदत्त उद्धव शिपकुले)**
**चंदगड** **दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, चंदगड**